राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.७०१२, ७०१३/२०२६

श्री. रोजबेह एम. आगा, (ज्येष्ठनागरिक)
मालक - देवल चाळ / इराणी चाळ,
फ्लॅट क्र. 2, रॉक हाऊस, वरळी हिल रोड,
वरळी, मुंबई-40001.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-4,
जी-दक्षिण विभाग, मुं.इ.दु.व पु. मंडळ,
कार्यकारी अभियंता /जी-दक्षिण विभाग,
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
विश्वराजा दर्शन को.ऑ.हौ.सो.मागे, 5 वा मजला,
प्रभादेवी रेल्वे स्टेशन जवळ, प्रभादेवी (प), मुंबई-400013.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता-4,जी-दक्षिण विभाग,
मुं.इ.दु.व पु. मंडळ, कार्यकारी अभियंता / जी-दक्षिण विभाग,
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
विश्वराजा दर्शन को.ऑ.हौ.सो.मागे, 5 वा मजला,
प्रभादेवी रेल्वे स्टेशन जवळ, प्रभादेवी (प), मुंबई-400013.

<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०८.२०२६</u>

अपीलकर्ता	:	उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	अनुपस्थित

अपिलार्थीनी दाखल केलेल्या **जोडपत्र अ** अन्वये बिल्डिंग क्रमांक ६, ६ ए, ८ आगा (इराणी चाळ) एलफिस्टन रोड, मुंबई-१३ येथील इमारतीचे ते मालक असून आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी तसेच त्यांच्या पत्नी महानाज आगा या उपस्थित असून त्यांनी दाखल केलेल्या जोडपत्राच्या अनुषंगाने एकूण चार मुद्यांची माहिती मागितली असता तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भात मागणी केलेल्या माहितीकरिता कार्यालयात उपलब्ध नस्तीच्या निरीक्षणा करीता दिनांक २५.०२.२०१६ रोजी त्यांना पाचारण केले. तथापि, अपिलार्थीनी त्यांना जारी करण्यात आलेली नोटीस तसेच त्या अनुषंगाने त्या कागदपत्रांच्या अथवा चौकशी अहवालाच्या आधारे उपरोक्त इमारत ही धोकादायक जाहीर करण्यात आली होती या संदर्भातील कागदपत्रे ही प्राधिकरणाचीच असल्याने ती त्यांना द्यावी अशी साधी विनंती असताना अपिलार्थी तसेच त्यांच्या पत्नी हे दोघेही अति वरिष्ठ नागरिक या संवर्गातील असूनही त्यांना माहितीचे अवलोकन करून म्हणजेच त्यांना माहिती मिळू नये या उद्देशाने त्रास दिला असा आक्षेप नोंदवित प्रथम अपील अर्ज दिनांक २७.०३.२०२६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जी/दक्षिण विभाग येथे दाखल केला. त्यावर झालेल्या सुनावणीत तत्कालीन अपिलीय

अधिकारी श्री.सुरेश चव्हाण यांनी दिनांक २५.०५.२०२६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-४ यांना निर्देशित केले की, अपिलार्थीनी उघड केलेली माहिती ही कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असल्यास ती त्यांना सात दिवसाच्या आत नि:शुल्क द्यावी.

अपिलार्थीनी या विरुद्ध द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून अद्यापही उपरोक्त अपिलीय आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदविला असून प्रस्तुत अपील अर्ज हे अपिलार्थी हे अति वरिष्ठ नागरिक या संवर्गात असल्याने प्राधान्याने सुनावणीस घेण्यात येत आहे. याप्रकरणी झालेला विलंब हा अपिलीय आदेशाचे उल्लंघन असून विद्यमान जन माहिती अधिकारी देखील आज उपस्थित नाहीत. परंतु त्यांचे प्रतिनिधी श्री.निलेश घाडगे, उप अभियंता हे उपस्थित असून त्यांनी अपिलीय अधिकाऱ्यांच्या दिनांक २५.०५.२०२६ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त इमारतीशी संबंधित नस्तीची छायांकित प्रत उपलब्ध करून दिली असून ती तात्काळ व विनामूल्य अपिलार्थीना प्रदान करावी तसेच या प्रकरणात झालेला विलंब यामागे कुठल्याही कारण मीमांसाचा खुलासा जन माहिती अधिकाऱ्यांकडून सादर करण्यात आला नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता तसेच यावर झालेल्या विलंबा बाबत यातील **कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये शास्ती कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा** व दिलेली माहिती ही **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** अन्वये देण्यात आली असल्याचा शिक्का व माहिती अधिकाराच्या लोगोसह अपिलार्थीना तात्काळ प्रदान करावी.

अपिलार्थी श्री.आगा व श्रीमती आगा यांनी या संदर्भात तत्कालीन अपीलीय अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर विद्यमान कार्यकारी अभियंता, जी/दक्षिण यांनी पुन:श्च एकदा कलम ७७ बी अन्वये उपरोक्त इमारत ही धोकादायक असल्याची नोटीस जारी केली असून या सर्व प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका अतिशय संशयास्पद असल्याचाही आरोप केलेला आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी **माहितीचा अधिकार अधिनियमातील** तरतुदी लक्षात घेता प्रशासकीय पातळीवर झालेल्या निर्णयाची मीमांसा करणे अथवा त्यावर कुठलाही अभिप्राय देणे ही बाब आयोगाच्या स्तरावर अपेक्षित नसून प्रस्तुत प्रकरणी मुख्याधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, श्री.मिलिंद शंभरकर (भा.प्र.से.) यांनी या संदर्भात प्रशासकीय पातळीवर उपरोक्त प्रकरणाची पडताळणी करून योग्य ती कार्यवाही करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत दोन्हीही द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

आदेश

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

२. अपिल क्र.७०१२, ७०१३/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १८-०८-२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**